## <u>नियमीत दिवाणी मुकदमा नं. २५१/२०१२ मधील निशाणी ४४ वरील आदेश</u>

(गजानन पाटील वि. दिलीप ठाकूर, ६)

**[CNR No.MHRG140007272009]**

---

१. वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश–६, नियम–१७ प्रमाणे दाव्यात अर्जामध्ये दुरुस्तीसाठी केला आहे.

२. सदर अर्जास प्रतिवादी यांनी हरकत घेवून असे कथन केले आहे की, सदरचा दाव्याकामी वादी यांचा अर्ज या प्रतिवादीस मान्य व कबुल नाही. सदर अर्जास जोरदार हतरकत आहे. सदर दाव्यातील वादी मागणी करीत असलेली दुरुस्ती स्पष्ट केलेली नाही. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलणार आहे. त्याचप्रमाणे कुलमुखत्यारपत्र रद्द करणेकरीता कायदेशीर नोटीस तसेच इतर बाबींचा संदर्भात झालेली नाही, अशावेळी दाव्याचे स्वरुप व मागणी बदलत आहे. तरी सदरचा अर्ज फेटाळण्यात यावी अशी मागणी प्रतिवादी यांनी केली आहे.

३. अर्ज, म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

४. वादी व प्रतिवादी यांचे परस्पर विरोधी कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ आले आहेत. सदरचे मुद्दे आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्ज मंजूर होणेस पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

### <u>कारणमिमांसा</u>

<u>**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत–**</u>

५. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादींनी सदरचा

दावा डिक्रेरेशन व खरेदीखत रद्द करुन मिळणेकरीता दाखल केला आहे. वादींचे पुढे असे कथन आहे की, सदर दावा कलम ६ मध्ये वादीने प्रतिवादी क्र. २ च्या लाभात दिनांक १९.१२.२००६ रोजी कुलमुखत्यारपत्र लिहून दिले नसल्याबाबतची कथने केलेली आहेत. परंतु वादीकडून विनंती कलमा कुलमुखत्यारपत्र रद्द करुन मिळण्याबाबतची मागणी करण्याचे अनावधानाने राहून गेलेले आहे. त्यामुळे वादी मागतो ती दुरुस्ती योग्य आहे. प्रतिवादीचे वकीलांनी असा युक्तीवाद केला की, वादीने मागितलेली दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याचे स्वरुप बदलणार आहे. त्याचप्रमाणे कुलमुखत्यारपत्र रद्द करणेकरीता कायदेशीर नोटीस तसेच इतर बाबींचा संदर्भात झालेली नाही अशावेळी दाव्याचे स्वरुप व मागणी बदलत आहे, त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर कामी मुद्दे निश्चित झाल्यानंतर वादीने सदरचा दावा दुरुस्तीचा अर्ज दिलेला आहे. वादीचे असे कथन आहे की, दाव्याचे वाचन केले असता वादीला वादीने प्रतिवादी क्र. २ च्या लाभात दिनांक १९.१२.२००६ रोजी कुलमुखत्यारपत्र लिहून दिले नसल्याबाबतची कथने केलेली आहेत परंतु सदर कुलमुखत्यारपत्र रदद करण्याची मागणी करण्याचे अनावधानाने राहून गेले आहे. वादीचे सदरचे कथन हे योग्य वाटते. वादीने मागितलेल्या दावा दुरुस्ती या दाव्याच्या दृष्टीने महत्वाच्या असल्याने सदरची दावा दुरुस्ती मंजूर करणे योग्य होईल.

७. सदरचा वादीचा दुरुस्ती अर्ज मंजूर झालेस दाव्यात आवश्यक असलेला मजकूर नमूद केल्यास दावा गुणदोषांवर न्यायनिर्णीत करणेस मदत होणार आहे. सदरचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही किंवा दाव्याचे स्वरुपात बदल होणार नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन व दोन्ही पक्षकारांचे हित लक्षात घेवून सदर दावा दुरुस्ती खर्चासह मंजूर करुन दुरुस्ती करण्यास परवानगी देणे न्यायोचित होणार आहे. सदर आदेशाद्वारे वादीला दाव्यामध्ये दुरुस्ती करता येणार आहे. वादीने दावा दुरुस्ती विलंबाने मागितली असल्याने वादीवर खर्च आकारणे योग्य व न्यायोचित होईल. सबब, वरील विवेचनावरुन मी मुद्दा क्रमांक १ साठी होकारार्थी मत नोंदवत आहे व मुद्दा क्रमांक २ साठी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | वादींचा अर्ज रुपये २,०००/– खर्चावर मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | वादीने खर्चाची रक्कम रुपये १,५००/– प्रतिवादींना द्यावी व रक्कम रुपये ५००/– तालुका विधी सेवा समिती उरण यांचेकडे जमा करावी. |
| ३. | वादींनी पुढील नेमल्या तारखेपर्यंत खर्चाची रक्कम भरुन केवळ दाव्यामध्ये योग्य ती नियोजीत दुरुस्ती करावी. |
| ४. | वादींनी दुरुस्त दाव्याची प्रत न्यायालयासाठी व प्रतिवादींसाठी दयावी. |

ठिकाण – उरण

दिनांक: २६.०६.२०२३

( निलेश एम. वाली )

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उरण.